लातूर जिल्हयाच्या आर्थिक विकासात तेल दाळ उद्योगांच्या योगदानाचा एक चिकित्सक अभ्यास
सन २०१२ ते २०२२

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयाच्या पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) पदवीकरीता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक विद्यार्थी

किरण दत्ता सुर्यवंशी

मार्गदर्शक

प्रोफेसर डॉ. पाटील शिवराज रामराव
अर्थशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद ता. अहमदपूर जि. लातूर

संशोधन केंद्र
अर्थशास्त्र विभाग
श्री. शिवाजी महाविद्यालय उदगीर ता. उदगीर जि. लातूर

ऑगस्ट 2023

1) प्रस्तावना :-

औदयोगिक क्रांती ही जगाच्या इतिहासातील अतिशय महत्वाची घटना मानली जाते. औदयोगिक क्रांतीमुळे जुन्या उत्पादन पध्दती मागे पडल्या तर दुसरीकडे नव्या यंत्राद्वारे मालाची निर्मीर्ती मोठया प्रमाणात होत गेली. अठराव्या शतकात औदयोगिक क्रांतीची इंग्लंडमध्ये सुरूवात झाली आणि नंतर युरोपीय देशात तिचा प्रसार झाला. 21 व्या शतकात कोणताही देश औदयोगिक क्रांतीच्या परिणामापासून दूर राहू शकला नाही. भारतातील विविध प्रांतात चहासारख्या मळयांनी औदयोगीकरणाची सुरूवात झाली. निळ उदयोगानंतर आसाममधील जंगलात चहाची रोपे लावली. यानंतर कापूस व ताग पिकावर लक्ष केंद्रीत केले. यानंतर कापड उदयोगाला भारतामध्ये सुरूवात झाली. कापड उदयोगाबरोबरच भारतातील पहिली ताग गिरणी बंगालमध्ये स्थापन झाली. याप्रकारे यंत्राच्या सहाय्याने भारतात विविध प्रकारचा उत्पादनाला सुरूवात झाली.

लातूर जिल्हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील एक जिल्हा आहे. या जिल्हयाची निर्मीती 16 ऑगस्ट 1982 रोजी झाली. लातूर हे महाराष्ट्रातील 16 व्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. नागरी लोकसंख्या एकुण लोकसंख्येच्या 56.01 टक्के आहे. लातूर जिल्हयातील प्रमुख तालुके रेणापूर, अहमदपुर, औसा, लातूर, निलंगा, उदगीर, देवणी, चाकुर, शिरूर अनंतपाळ आहेत. शिक्षण, शेती, व्यापार उद्योग या तिन्ही महत्वाच्या क्षेत्रामध्ये प्रगती केलेले फार कमी जिल्हे आहेत. यामध्ये आपल्याला लातूरचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. मराठवाडयात लातूर आपला वेगळा ठसा उमटवीत आहे. उस्मानाबाद जिल्हयाचा विभाजनानंतर निर्माण झालेल्या लातूरने विकासाचे दिशेने अतिशय वेगाने वाटचाल केली आहे. तसेच लातूर जिल्हयाचा औदयोगीकरणात सिंहाचा वाटा असणारा उद्योग म्हणजे कृषी आधारीत उदयोग होय. त्यामध्ये दाळमील, दुध डेअरी साखर कारखाने, तेल बिया, कुक्कूटपालन, मत्स्यव्यवसाय इत्यादी आहेत. महाराष्ट्रात साखर उदयोग हा कृषी आधारीत असा प्रमुख उदयोग मानला जातो. ग्रामीण भागातील सुमारे अडीच कोटी लोकांचे जीवन साखर उदयोगावर अवलंबून आहे. साखरेतून महाराष्ट्राला सुमारे 2200 कोटी रूपयांचा महसूल प्राप्त होतो. एका साखर कारखान्यामुळे ऊस लागवडीपासून साखर बाजारपेठेत पोहोचेपर्यंत सर्व प्रकारचा प्रक्रीयामध्ये 5000 लोकांना थेट रोजगार उपलब्ध होतो. या आकडेवारीने

महाराष्ट्रातील साखर उदयोगाचे स्थान आधोरेखीत होते. राज्यात एकूण 202 नोंदणीकृत साखर कारखाने असून त्यामधून वर्षाला सुमारे 12000 कोटींची उलाढाल होते. लातूर जिल्हयातील सहकारी आणि खाजगी असे एकूण 10 साखर कारखाने सुरू आहेत. जिल्हयात एकूण 51000 हेक्टर ऊसाचे क्षेत्र आहे. मराठवाडयात साखर कारखानदारीला दिशा देण्याचे काम लातूर जिल्हयातील सहकारी आणि खाजगी साखर कारखानदारीने केले आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी माजी सहकारमंत्री केशवराव सोनवनेनी डालडा कारखाना स्थापन केला. जो सहकारी तत्वावर स्थापलेला आशियातील पहिला कारखाना आहे. महाराष्ट्राचा ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला विशेष स्थान आहे. गाय, म्हैस, बैल, शेळया मेंढया, कोंबडी या प्राण्यांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये मोलाचे स्थान आहे. लातूर विभागामध्ये लातूर, धाराशिव(उस्मानाबाद), नांदेड आणि हिंगोली जिल्हयाचा समावेश होतो. या जिल्हयात गायी, म्हशी, बेल तसेच शेळया मेंढया, कोंबडया यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. लातूर जिल्हा हा देवणी गोवंश, मराठवाडी म्हेस, पशमी व कारवान श्वानासाठी ओळखला जातो. शेतीपूरक उदयोगामध्ये दुग्धव्यवसाय हा प्रमुख व्यवसाय मानला जातो. लातूर जिल्हयामध्ये शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय हा शेतीपुरक व्यवसाय म्हणून स्वीकारल्यामुळे वर्षभर उत्पादन व रोजगाराचे साधन निर्माण झाले आहे. दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन व्यवसाय यासारखाच रेशीम शेती व्यवसाय हा शेतीस पुरक व्यवसाय आहे. कापूस, सोयाबीन, फळबागा यासाठी प्रसिध्द असलेल्या मराठवाड्याला आज दुष्काळ, गडगडलेले शेतमालाच्या किंमती, मजूरी व वाढता उत्पादन खर्च या समस्यांनी ग्रासले आहे. अशावेळी दाळमील व तेल उपद्योग लातूरचा अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम करीत आहेत. तेल व दाळमील उदयोगातील अग्रेसर म्हणून लातूरचे नाव घेतले जाईल. सुधारीत तंत्रज्ञान, प्रशिक्षण, अनुदान यांच्या आधारे दाळमील व तेल उदयोग चांगल्या दर्जाचे निर्यातदार वस्तु तयार करू लागला आहे.

तेल या उदयोगामध्ये लातूरची बाजारपेठ देशामध्ये अग्रेसर मानली जाते. लातूरचे प्रमुख उत्पादन विविध तेलबिया व दाळी आहेत. तेल व दाळीचे उत्पादन सर्वात जास्त आहे. आणि या क्षेत्रामध्ये रोजगारसुध्दा जास्त आहे.

लातूर जिल्हयातील कृषी आधारे प्रमुख उदयोग म्हणजे दाळमील होय. सुमारे 1500 कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल असलेला लातूरचा दाळमील उदयोग होय. [लातूर शहरात सुमारे 70 दाळमील आहेत. त्यातून दररोज 1000 क्विंटल तूर आणि चनादाळ तयार होते. लातुरचा

मीलमधून तयार होणारी फटका दाळ प्रसिध्द आहे. ती देशभरातील सर्वच मॉल्समधून विकली जाते. वार्षिक सरासरी 1500 कोटी रूपयांची उलाढाल या उदयोगातून होते. त्यासाठीचा कच्चा माल असलेल्या तूरीच्या दररोज 100 ते 125 गाडयांची खरेदी लातूरच्या बाजारपेठेत केली जाते. देशातील तूरीचे भाव लातूरच्या बाजारपेठेवर अवलंबून आहे.

हैद्राबादच्या निजाम काळात लातूर प्रमुख व्यापारकेंद्र बनले. ही कृषी आधारे अर्थव्यवस्था व औद्योगीक केंद्रसुध्दा आहे. तेल बिया मुख्यतः सुर्यफुल व सोयाबीन, करडई, कुलुप, ब्रास, दूध चूर्ण, सुत व्यापारासाठी प्रसिध्द आहे. तेल बिया लातूर भागाचे प्रमुख उत्पादन आहे. लातूरच्या आर्थिक विकासात तेल व दाळ उद्योगाचा अमुल्य वाटा आहे. म्हणून जिल्ह्याचा विकासात तेल व दाळबिया उदयोगांचा लातूरचा आर्थिक विकासामध्ये उत्पन्न, उत्पादन, रोजगार, निर्यात इत्यादी सहभाग अभ्यासने गरजेचे आहे.

२) *संशोधनाची* उद्दिष्टये *: -*

प्रस्तुत संशोधनाची खालील उद्दिष्टये आहेत.

- लातूर 'जिल्हयातील तेल व दाळ उदयोगांचा वाढीचा अभ्यास करणे.
- लातूर जिल्हयातील तेल व दाळ उदयोगांचा तालुकानिहाय अभ्यास करणे
- लातूर जिल्हयातील विकासात तेल व दाळ उदयोगांचा प्रभाव व परिणामांचा अभ्यास करणे.
- लातूर जिल्हयातील तेल व दाळ उदयोगांचा औदयोगीक व सेवा क्षेत्रावरील परीणामांचा अभ्यास करणे.
- लातूर जिल्हयातील तेल व दाळ उदयोगांचा शेतकऱ्याच्या अर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

3) *संशोधनाची गृहितके* :-

प्रस्तुत संशोधन अभ्यासात खालील गृहितके निश्चित केली आहे.

- लातूर जिल्हयातील तेल व दाळ उद्योग प्रमाण / संख्या वाढत आहे.
- शेतीवरील अवलंबीत्व कमी होऊन तेल व दाळ उदयोग वाढत आहेत.
- लातूर जिल्हयातील तेल व दाळ उदयोगांचा जिल्हयाचा ओदयोगीक विकासावर अनुकूल परिणाम होत आहे.
- तेल व दाळ उद्योगामुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढत आहे.
- तेल व दाळ उद्योगामुळे औद्योगीक व सेवा क्षेत्राचा विकास होत आहे.

4) *संशोधन पध्दती :-*

सदरील संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल व त्यासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचे संकलन पुढील स्त्रोताव्दारे केले जाईल.

प्राथमिक माहिती :-
संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतामधून तेल व दाळ उदयोजकांच्या मुलाखतीद्वारे माहिती नमुना निवड पध्दतीने केली जाऊन ही अनुसुचीत व प्रत्यक्ष निरीक्षणाच्या आधारे तेल व दाळ उदयोगांची माहिती संकलीत केली जाईल.

दुय्यम माहिती :-
या साधनसामग्रीमध्ये संशोधन प्रबंध, शोधनिबंध, संदर्भग्रंथ, नियतकालिकातून प्रकाशित झालेले लिखाण, मासिके, कार्यालयीन दस्तऐवज, वृत्तपत्रे, वेबसाईट वगैरेमधून घेण्यात येईल.

5) संशोधनाचे महत्व :-

तेळ व दाळ उदयोग क्षेत्रामध्ये फार कमी प्रमाणात संशोधन आहे. तेल व दाळ उदयोग क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त रोजगार पुरवण्याची ताकद आहे. लातूर जिल्हयाचा विकासात तेल व दाळ उदयोगांचा अमुल्य वाटा आहे. त्याचावर अभ्यास करणं महत्वाचे आहे.

6) संशोधन क्षेत्र व कालावधी:-

प्रस्तुत संशोधन अभ्यास विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. हे संशोधन लातूर जिल्हयापुरते मर्यादित आहे. तसेच या संशोधनाकरीता सन 2012 ते 2022 असा एकूण 11 वर्षाचा कालावधी घेण्यात आला आहे.

7) *संशोधनाचा मर्यादा :-*

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

- प्रस्तुत संशोधन लातूर जिल्हयातील तेल व दाळ उदयोगासंबंधीचे आहे.
- या संशोधनात लातूर जिल्हयातील तेल व दाळ आधारीत उदयोग व त्याच्याशी पुरक असणाऱ्या व्यवसायाचाच अभ्यास केला जाईल.
- प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष फक्त लातूर जिल्हयातील तेल व दाळ आधारीत उदयोगांनाच लागू होतील.
- प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम माहिती वापरली जाईल

8) नियोजीत संशोधनाची रूपरेषा :-

प्रस्तुत संशोधनात खालील प्रकरणांचा समावेश केला आहे.

प्रकरण *1)* प्रस्ताविक

प्रकरण *2)*संशोधन साहित्याचे सिंहावलोकन व संशोधन पध्दती.

प्रकरण *3)* लातूर जिल्हयाचे आर्थिक व सामाजिक अध्ययन.

प्रकरण *4)* लातूर जिल्हयातील तेल व दाळ उद्योगांचा विकास

प्रकरण 5) लातूर जिल्हातील तेल व दाळ उद्योगांचे शेतकऱ्याच्या अर्थिक स्थितीवरील परिणाम.

प्रकरण *6)* लातूर जिल्हयातील तेल व दाळ उद्योगांचा औद्योगिक व सेवा क्षेत्रावरील परिणाम.

प्रकरण *7)* निष्कर्ष व शिफारशी

9) संदर्भसुची :-

लेखकाचे नांव	प्रकाशन वर्ष	ग्रंथाचे नांव	प्रकाशकाचा पूर्ण पत्ता
सरवटे दिलीप	1989	उदयोजक बना	अभिजीत पब्लिशर्स पुणे
सिमरे अल्का	2002	भारतीय अर्थव्यवस्था	सुयश प्रकाश पुणे
इंटरनेट			
अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई	2013	जिल्हा सामाजिक व अर्थिक समालोचन	महाराष्ट्र शासन मुंबई
पंडीत शांता	1988	उदयोगाचे अर्थशास्त्र	महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ नागपूर

www.latur.nic.in

संशोधक विद्यार्थी
किरण दत्ता सुर्यवंशी

मार्गदर्शक
प्रो. डॉ. पाटील शिवराज रामराव
अर्थशास्त्र विभाग
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
शिरूर ताजबंद ता, अहमदपूर जि. लातूर